इयत्ता १ली ते ४थी मधील शाळेत जाणा-या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

शिक्षण व सेवायोजन विभाग

शासन निर्णय क्रमांक- पीआरई-१०९१/[९६१४]/प्राशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक- 90 जानेवारी, १९९२.

संदर्भ :- शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.टीएसपी-१०९१/ वा.यो./उ.भ १९९१-९२/टि.एस.पी.कक्ष, दि. २९-८-९१.

शासन निर्णय :- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याबाबतच्या धोरणानुसार प्राथमिक शाळेत जाणा-या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी इ. १ली ते ४थी मधील शाळेत जाणा-या " आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारिद्र्य रेषेतील खालील विद्यार्थीनीना नियमित शाळेत उपस्थित रहाण्यासाठी प्रतिदिनी प्रत्येक मुलीमागे १ रु.या दराने मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, इ.१ली ते ४थी मध्ये शाळेत जाणा-या अनुसूचित जमाती मधील मुलींना व अनुसूचित जाती, भटक्या व विमुक्त जमातीतील दारिद्र्यरेषेखालील मुलींना व आश्रम शाळेत डेस्कॉलर मुलींना प्रतिदिनी रु १/- प्रमाणे उपस्थिती भत्ता सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील [ जोडपत्र "अ"] नियमानुसार दि. ३-१-१९९२ या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी सुरु करण्यास नियमानुसार शासन अनुमती देत आहे.

३. यासाठी होणारा खर्च पुढील अर्थशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१] बिगर आदिवासी क्षेत्र - लेखाशीर्ष

" २२०२ सर्वसाधारण शिक्षण-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-१०३ प्राथमिक शाळांसाठी स्थानिक संस्थांना सहाय्य[१]म.जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जि.प. ना योजनांतर्गत अनुदाने [ए]राज्य

योजनांतर्गत योजना.

२] आदिवासी क्षेत्र- लेखाशीर्ष ]

"२२०२-सर्वसाधारण शिक्षण-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-१०३-प्राथमिक शाळांसाठी स्थानिक संस्थांना सहाय्य[१] महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७अन्वये जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने [ए] राज्य योजनांतर्गत योजना [ २२०२१७९७]-टी-८" व पुरवणी मागणीद्वारे मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर खर्च[ बिगर आदिवासी विभाग] शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक- आकनि- ११९२/१२४ अर्थसंकल्प-६ दि. ४ जानेवारी, ९२ अन्वये मंजूर केलेल्या अग्रीम रु २०[redacted],००,०००/- [ रुपये दोन [redacted] यामधून व [आदिवासी विभाग] शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक:आकनि ११९२/१३८/अर्थसंकल्प १७, दि. ८ जानेवारी, १९९२ अन्वये मंजूर केलेल्या अग्रीम रु.८१,००,००० [redacted] ऐक्याऐंशी [redacted]

४. मंजूर अग्रीम रक्कम दि.२९-२-९२ पर्यंत पूर्ण खर्च करावी व प्रत्यक्ष खर्ची पडलेल्या रकमेबाबत सविस्तर अहवाल शिक्षण संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी शिक्षण विभागास दि. १-४-९२ पूर्वी पाठवावा.

संबंधित खर्च हा आकस्मिक निधी अग्रीमामधून खर्ची पडणार असल्यामुळे महाराष्ट्र आकस्मिकता निधी नियमावलीतील नियम क्र. ६,८ व १२ प्रमाणे देयके सादर करतांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

अ] आकस्मिक निधीतून करण्यात येणा-या खर्चासंबंधिच्या प्रत्येक प्रमाणकावर तांबड्या शाईने " रुपये आकस्मिक निधीतून अशी नोंद घेण्यात यावी.

ब] जर आकस्मिक निधीतून मंजूर झालेली रक्कम पूर्ण खर्च होणार नसेल तर अग्रीम रक्कम कमी करण्यासाठी शासनाकडे वेळीच प्रस्ताव सादर करण्यात यावा.

क] आकस्मिक निधीतून खर्च करण्यात येणा-या रकमेचा सतत मेळ घालण्यात यावा.

ड]आकस्मिक निधीतून केलेल्या खर्चासाठी काढावयाची रक्कम वेगळी बील पाठवून काढावी.

इ] अशा प्रत्येक बिलावर व प्रती पत्रावर वित्त विभागाने ज्या शासकीय ज्ञापनाद्वारे अग्रीम मंजूर केले आहे. त्याचा क्रमांक आकनि-

..३/-

५३४ अर्थ-९, दिनांक-४/२/१९९२ [ कोड नं ८०००-१३८-२]
बिगर
[आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी] व [बिगर आदिवासी क्षेत्रासाठी
अन्वये [कोड नं. ८०००-१३८-९]
क्रमांक-आकनि- ११९२/१३८ अर्थसंकल्प दिनांक-८/१/१९९२ नमूद करावा.

फ] बोलासोबत पाठविलेल्या स्लीपवर लेखाशिष कोड नंबर व खर्चाचा

कोड नंबर नमूद करावा.

६] हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या

सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक क्रमांक- १७६३/९१/व्यय-५,

व दिनांक- १६-१२-९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

संगणक संकेतांक २००१०९२८७१६८४३८८००९ मं. मु. कुलकर्णी
[ मं. मु. कुलकर्णी ]
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक [ बृहन्मुंबई सोडून]
मुख्य कार्यकारी अधिकारी [ सर्व जिल्हा परिषद]
शिक्षण अधिकारी [ प्राथमिक ] सर्व जिल्हा परिषद]
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
महालेखापाल-१/२, मुंबई/नागपूर
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
ग्राम विकास विभाग
वित्त विभाग [व्यय-५] अर्थसं-३, ६]
नियोजन विभाग
आदिवासी विकास विभाग, का-१२
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग,
सर्व जिल्ह्याचे जिल्हा अधिकारी व सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन व विकास मंडळ,
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आयुक्त, आदिवासी उपयोजना नाशिक/नागपूर.